


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे | अंक : ७२८ . वा | गुरुवार | दि. ०४ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# मंत्री गुलाबराव पाटील यांच्या जिभेला हाड नाही का?

## भाजपच्या निष्ठावंतांचा तीखट सवाल भाजपच्या लोकसभा प्रभारींबद्दल अभद्र बोलले होते गुलाबराव...

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्य सरकारमधील मंत्री तथा बुलढाण्याचे तत्कालीन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या जिभेल काही हाड नाही का, असा प्रश्न निष्ठावंत भाजपचे कार्यकर्ते विचारू लागले आहेत. दोन दिवसांपूर्वी गुलाबराव पाटील यांनी माजी आमदार तथा भाजपा नेते विजयराज शिंदे यांच्याविरोधात अभद्र शब्दांचा वापर केला होता. राज्यातील एका जबाबदार मंत्र्याने आपल्याच सहकारी पक्षातील एका नेत्यावर अशाप्रकारची टिप्पणी करणे कितपत शोभनीय आहे, असा प्रश्न भाजपचे कार्यकर्ते विचारू लागले आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून बुलढाण्याच्या जागेवरून भाजप-शिवसेनेत रस्सीखेच सुरू होती. एकसंध शिवसेना असताना सातत्याने बुलढाणा मतदारसंघ शिवसेनेकडे राहिला होता. परंतु आता शिवसेना दुभंगल्याने तिची ताकद कमी झाली आहे. पर्यायाने आता ही जागा आपल्याकडे यावी, अशी तीव्र मागणी भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांची होती. शिवाय खासदार प्रतापराव जाधव यांच्याविरोधात भाजपमध्ये मोठी नाराजी होती. प्रतापराव जाधव हे एकदा निवडून आले की, सातत्याने भाजप कार्यकर्त्यांची अवहेलना व दुर्लक्ष करतात, असा कार्यकर्त्यांचा आरोप होता. दुसरे महत्वाचे हे की, यंदाच्या निवडणुकीत प्रतापरावांच्या विरोधात नागरिकांमध्ये प्रचंड रोष असल्यामुळे ते निवडून येणार नाहीत, असा दावाही भाजप कार्यकर्ते करीत होते. दरम्यान, भाजप ही जागा आपल्याकडे खेचून घेईल व शिवसेनेची संधी जाईल, या भीतीने शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी पद्धतशीरपणे स्ट्रॅटेजी खेळत विद्यमान आमदार संजय गायकवाड यांनी थेट खासदारकीसाठी अर्ज दाखल केला. या अर्जामुळे प्रचंड गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. बऱ्याच भाजप नेते व कार्यकर्त्यांना वाटले की, ही शिंदे गटातील अंतर्गत गटबाजी आहे. परंतु त्याच्या दुसऱ्याच दिवशी झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात संजय गायकवाड यांनी ही राजकीय खेळी असल्याचे सांगत आपली ही खेळी यशस्वी झाल्याचे सांगितले. या माध्यमातून शिवसेनेने भाजपवर दबाव टाकला व ही जागा पदरात पाडून घेतली, असे बोलले जात आहे. या स्ट्रॅटेजीमुळे जिल्ह्यातील भाजपला शिवसेनेने चेकमेट दिल्याचे बोलले जात होते. शिवसेनेच्या या खेळीवर कडी करण्यासाठी मग कार्यकर्त्यांच्या मागणीवरून भाजपचे लोकसभा मतदारसंघ प्रभारी विजयराज शिंदे यांनीही आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्या अर्ज दाखल करते वेळी जुने व नवीन असे असंख्य भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. यावरून हे स्पष्ट आहे की, भाजप कार्यकर्त्यांची मानसिकता या वेळी प्रतापराव जाधव यांचे काम करण्याची अजिबात नाही. दरम्यान, काल प्रतापराव जाधव यांचा अर्ज दाखल करताना राज्याचे मंत्री गुलाबराव पाटील हे स्वतः हजर होते. त्यांना पत्रकारांनी विजयराज शिंदे यांच्याबाबत विचारले असता, खरे तर गुलाबरावांनी अत्यंत संयम व जबाबदारीने उत्तर देणे गरजेचे होते. परंतु तसे न करता गुलाबराव यांनी विजयराज शिंदे यांना त्यांची औकात दिसून पडेल असे अत्यंत जहाल वक्तव्य केले.





गुलाबरावांचे हे वक्तव्य भाजपच्या जुन्या-नव्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना चांगलेच झोंबलेले आहे. गुलाबरावांनी कदाचित थोडे सौम्य किंवा जबाबदार वक्तव्य केले असते, तर आधीच भाजप-शिवसेनेत पडलेल्या ठिणगीला विझवता आले असते. परंतु संयमाने आणि जबाबदारीने बोलतील ते गुलाबरावच कसले. ते नेहमी असे आततायी विधाने करण्यातच जास्त मशगुल आहेत. पालकमंत्री असतानाही बुलढाणा जिल्ह्याकडे ढुंकूनही न पाहणारे गुलाबराव मात्र प्रतापरावांच्या अर्ज भरण्यासाठी जिल्ह्यात जरुर हजर होते. गुलाबराव यांना कधी बुलढाण्याच्या विकासाकडे लक्ष द्यायला वेळ मिळाला नाही. जिल्ह्याचे प्रश्न सरकार दरबारी मांडण्यासाठी गुलाबराव कधीही सरसावल्याचे दिसले नाही. याउलट आपल्याच मित्रपक्षाच्या किंबहुना राज्यात व देशात आता मोठा भाऊ असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या लोकसभा प्रभारीविषयी इतकं हीन वक्तव्य करणं हे गुलाबरावांना शोभत नाही, असा सूर भाजपचे कार्यकर्ते लावत आहेत. एकीकडे कार्यकर्त्यांची भावना प्रतापरावांच्या विरोधात असली, तरी भाजपचे वरिष्ठ पदाधिकारी, लोकप्रतिनिधी अर्ज दाखल करताना उपस्थित होते. त्यांनीही अद्याप गुलाबरावांच्या वक्तव्यासंदर्भात आपले तोंड उघडले नाही. आपल्या पक्षाच्या एखाद्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यासंदर्भात असली अभद्र टिप्पणी केली जाते आणि हे नेते व लोकप्रतिनिधी गप्प राहतात, यावरून हे स्पष्ट आहे की, पदाधिकारी किंवा लोकप्रतिनीधींना आपल्याच पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या भावनांशी काहीही ताळमेळ राहिलेला नाही. प्रत्येक वेळी भाजप कार्यकर्त्यांना भावनिक आवाहन करून त्यांना निवडणुकीत कामाला जुंपले जाते. परंतु नंतर पाच वर्षे त्यांना कोणीही विचारत नाही, ही वस्तुस्थिती आहे. काहीही असले तरी गुलाबराव पाटील यांना अशाप्रकारचे वक्तव्य करावयास नको होते. मित्रपक्ष भाजपच्या एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याचा या पद्धतीने अवमान करायला नको होता, अशी भावना भाजप कार्यकर्ते बोलून दाखवत आहेत. याचे परिणाम प्रतापराव आणि शिंदे गटाला भोगावे लागतील, अशीही तिखट प्रतिक्रिया काही भाजप कार्यकर्त्यांनी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनशी बोलताना दिली.

## कार व दुचाकीच्या अपघातात २ ठार

**जनसंचलन/मलकापूर**

भरधाव कारने समोरून येणाऱ्या दुचाकीस्वारास धडक दिल्याने सदर अपघातात दुचाकी वरील दोन मजुरांचा मृत्यू झाल्याची घटना महामार्ग क्रमांक ६ वरील धानोरा विटाळी उड्डाणपुलाजवळ ३ एप्रिल रोजी घडली. याबाबत सविस्तर वृत्त असे की, तालुक्यातील ग्राम वडोदा येथे बांधकामासाठी नांदुरा तालुक्यातील गोसिंग येथील संजय दुर्योधन हाडे (३५), मंगेश शांताराम सुरळकर (२८) हे दोघे मोटर सायकल क्रमांक एमएच २८ एएफ २४९५ ने आले होते. सायंकाळी बांधकाम आटोपून त्यांच्या दुचाकीने गोसिंग येथे जात असतांना त्यांच्या दुचाकीस जिजे १५ सीजे ६६७२ या कारने जोरदार धडक दिली. या धडकेत संजय दुर्योधन हाडे (३५) याचा घटनास्थळी जागीच मृत्यू झाला. तर मंगेश शांताराम सुरडकर हा गंभीररित्या जखमी झाला. गंभीर जखमीला बुलढाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारादरम्यान नेत असताना वाटेतच त्याचाही मृत्यू झाला. अपघात प्रकरणी कार चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे पीएसआय प्रशांत राठोड करीत आहे.

## पाणी पुरवठादाराकडून दरपत्रक आमंत्रित...

**जनसंचलन/बुलढाणा**

शैक्षणिक सत्र सन २०२४-२५ वर्षासाठी ७५ विद्यार्थी क्षमतेच्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी आरओ कॅनद्वारे पुरवठा आणि विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी ट्रॅंकरद्वारे पाण्याचा पुरवठा नियमीत स्वरुपात करण्याकरिता दरपत्रक आमंत्रित करण्यात आले आहे. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागास-वर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, खामगांव येथे संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# निवडणूक कालावधीत राज्य उत्पादन शुल्काची कारवाई
## आतापर्यंत ७० गुन्हे नोंद उत्पादन शुल्कचे चेकपोस्ट

**जनसंचलन/ खामगाव**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहिता कालावधीमध्ये विशेष मोहिम राबविण्यात आली. यात ७० गुन्हे नोंदविण्यात आले आहे. यात ६८ वारस गुन्हे आणि ६९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर कारवाईत २ वाहनासह ८ लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या गुन्ह्यामध्ये देशी मद्य ३०३.३० लिटर, विदेशी मद्य २७ लिटर, रसायन सडवा ११ हजार २६५ लिटर, हातभट्टी ६८३ लिटर, बिअर ७.८ लिटर पकडण्यात आली आहे. राज्य उत्पादन शुल्कच्या खामगावच्या पथकाने मध्यप्रदेश सीमेला ४ किलोमीटर अंतरावर असलेल्या उमापूर, ता. जळगाव जामोद येथे ३ गुन्हे नोंदवून २३ हजार ४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. निवडणुकीच्या अनुषंगाने सीमा तपासणी नाक्यावर निमखेडी व हनवतखेड, ता. जळगाव जामोद, तसेच चिखली-जाफ्राबाद रोडवर भोकर येथे तात्पुरते चेकपोस्ट तयार करण्यात आले आहे. तसेच जिल्ह्यातून जाणारे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्ग, तसेच विविध जिल्ह्यात जाणाऱ्या ट्रॅव्हल्सची भरारी पथकाकडून तपासणी करण्यात येत आहे.राज्य उत्पादन शुल्कला आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ११ कोटी १२ लाखांचे महसुली उद्दिष्ट देण्यात आले होते. या कार्यालयाने ९७ टक्के उद्दीष्ट प्राप्त करीत १० कोटी ८० लाख रुपयांचा महसूल गोळा केला. आपल्या परिसरात अवैध मद्यविक्री अथवा



बनावट मद्यनिर्मिती आढळल्यास विभागास टोल फ्री क्रमांक १८००८३३३३३ वर किंवा व्हॉटसॲप नंबर ८४२२००११३३ किंवा excisesuvidha.mahaonline.gov.in पोर्टलवर तात्काळ माहिती कळवावी. तसेच जिल्ह्यातील किरकोळ आणि ठोक मद्य अनुज्ञप्तीधारकांच्या अनुज्ञप्तीमध्ये बनावट मद्य आढळुन आल्यास अनुज्ञप्ती कायमस्वरुपी रद्द करण्यात येणार आहे.

# १० लाखांची कॅश पकडली भरारी पथकाची कारवाई

**जनसंचलन/बुलढाणा**

लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरु असताना एक मोठी बातमी समोर आली आहे. निवडणूक आयोगाने नेमलेल्या भरारी पथकाने मोठी कारवाई केली असून तब्बल १० लाख रुपयांची रोकड जप्त केली आहे. येळगाव येथील टोलनाक्यावर मंगळवार मध्यरात्री ही रोकड पकडण्यात आली. तहसीलदारांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे. प्राप्त माहितीनुसार, बुलडाणा चिखली रस्त्यावरील येळगाव टोलनाक्यावर निवडणूक आयोगाचे भरारी पथक कार्यरत असून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी करीत आहेत. दरम्यान मंगळवारी रात्री पावणे ११ च्या सुमारास चिखलीकडून बुलडाण्याकडे येत असलेल्या एका चारचाकी वाहनाची तपासणी करण्यात



आली. यावेळी गाडीच्या डीक्कीत १० लाख रुपयांची रोकड पकडण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना या प्रकरणाची माहिती देण्यात आली असून सदर रक्कम इन्कम टॅक्स विभागाकडे सोपवण्यात आली असून ही रक्कम कोणाची ? कुणाला देण्यासाठी नेण्यात येत होती ? रक्कम कुठून आणली याबाबत सध्या चौकशी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. चौकशी सुरू असल्याचे तहसीलदारांनी सांगितले.

# शुल्लक कारणावरून लोखंडी हूक मारुन जखमी केले

**जनसंचलन/ खामगाव**

मुलाला किराणा दुकानात सामान आणण्याकरीता पाठविले असता त्या मुलाची चड्डी ओढल्याच्या कारणावरुन वाद झाला. या वादात हुक मारुन दोषांना जखमी केले. नाहीद परवीन शेख साजीद (२४) रा. फुकटपुरा चांदमारी या महिलेने १ एप्रिल रोजी शहर पोस्टेला तक्रार दिली की मी माझ्या लहान मुलाला किराणा दुकानामध्ये सामान आणण्याकरीता पाठविले असता हसीनाबी शेख हनीब या महिलेच्या मुलाने त्याची चड्डी ओढली त्यामुळे मुलगा रडत होता. नाहीद परवीन ही म्हणायला गेली असता तिला हसीनाबी शेख हनीब या महिलेने शिवीगाळ केली. नाहीद परवीन हिचा भाचा भांडण सोडविण्यासाठी आला असता त्याला हुक मारुन जखमी केले तसेच हसीनाबीचे सासरे यांना सुध्दा ओढताण केली तसेच पतीलाही लोखंडी हुक लागली. शहर पोलिसांनी आरोपी हसीनावी शेख हनीफ, शेख हुसेन शेख इसाक रा. बडे प्लॉट व २ अनोळखी इसम अशा ४ जणांविरुध्द कलम ३२४, ३५४, ४५२, ५०४, ५०६, ३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# अल्पवयीन मुलील फुस लावून पळवून नेले...

**जनसंचलन/नांदुरा**

एका १६वर्षीय अल्पवयीन मुलीला एका २१ वर्षीय युवकाने लग्नाचे आमीष दाखवून पळून नेल्याची घटना तालुक्यातील चांदुर बिस्वा येथे २ एप्रिल रोजी दुपारी ४.३० वाजे दरम्यान घडली. याप्रकरणी अल्पवयीन मुलीच्या आईने नांदुरा पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की माझी १६ वर्षाची मुलगी व संशयित आरोपी गजानन भागवत खुटाफळे वय २१ वर्षे रा. मोरगाव दिग्रस या दोघांमध्ये प्रेम संबंध असून ती घटनेच्या दिवशी व घरासमोर उभी होती. थोड्यावेळाने पाहिले तर ती दिसली नाही. म्हणून असता तिने तो उचलला नाही. तिचा गावात शोध घेतला. मात्र ती कुठेही मिळून आली नाही. त्यानंतर बस स्टॅन्डवरील एका गॅरेज मालकाने आम्हाला सांगितले की एक २०ते २१ वर्षे वयाचा मुलगा दुचाकी वर आला व तुमच्या मुलीला गाडीवर बसवून घेऊन गेला. यावरून उपरोक्त आरोपीनेच माझ्या मुलीला लग्नाचे आमीष दाखवून पळून नेल्याचा संशय आहे. याप्रकरणी संशयित आरोपी गजानन खुटाफळे याच्या विरोधात भांदवीच्या कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# ३ एप्रिल रोजी लोकसभा निवडणुकीसाठी सहा उमेदवारांचे अर्ज दाखल...





**जनसंचलन/बुलडाणा**

बुलडाणा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी आज ६ उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले आहे. उमेदवारांनी त्यांचे नामांकन अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्याकडे सादर केले. दरम्यान गुरूवार, दि. ४ एप्रिल ही नामांकन अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत आहे. आज बुलडाणा लोकसभा निवडणुकीसाठी ४ जणांनी ८ अर्जाची उचल केली. दरम्यान आज सहा उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहे. आतापर्यंत ५३ जणांनी १२४ अर्जाची उचल, तर १२ उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले आहेत. आज नंदू जगन्नाथ लवंगे अपक्ष, उद्धव ओंकार आठोळे अपक्ष, मोहंमद हसन इनामदार मायनॉरिटी डेमोक्रेटिक पार्टी, संदिप शेळके अपक्ष, सुमन मधुकर तिरपुडे पिपल्स पार्टी ऑफ इंडिया, रविकांत चंद्रदास तुपकर - अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. यात मोहंमद हसन इनामदार आणि रविकांत चंद्रदास तुपकर यांनी कालही नामांकन अर्ज दाखल केले आहेत. लोकसभा निवडणुकीची अधिसूचना दि. २८ मार्च रोजी प्रसिद्ध झाली आहे. इच्छुकांना दि. ४ एप्रिलपर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी नामांकन अर्ज सादर करता येणार आहे. दाखल करण्यात आलेल्या नामनिर्देशन पत्रांची दि. ५ एप्रिल रोजी छाननी करण्यात येणार आहे. तसेच दि. ८ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. दि. २६ एप्रिल रोजी मतदान होणार असून दि. ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. लोकसभा निवडणुकीसाठी नामांकन अर्ज दाखल करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज आहे. उमेदवारांना कोरे नामांकन पत्र देणे, अनामत रक्कम भरणे तसेच अर्ज दाखल करण्यापूर्वी छाननीची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच उमेदवारांना ऑनलाईन नामांकन अर्ज दाखल करता येणार आहे. नामांकन अर्ज दाखल करण्यासाठी उद्या दि. ४ एप्रिलपर्यंत वेळ आहे. शेवटच्या दिवशी वेळेवर धावपळ टाळण्यासाठी इच्छुकांनी वेळेच्या आत अर्ज दाखल करावेत, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नो व्होटर टू लेफ्ट बिहाइंड दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांच्या मताधिकारासाठी यंत्रणांनी दक्ष राहावे

जनसंचलन/बुलढाणा

सशक्त लोकशाहीसाठी एकही मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही, यादृष्टीने दिव्यांग, तसेच ८५ वर्षावरील ज्येष्ठांच्या शतप्रतिशत मताधिकाराबद्दल व्यापक जाणीव जागृती करण्यासाठी सर्व संबंधित घटकांनी संयुक्तरित्या प्रयत्न करून मतदानाचा टक्का वाढवावा, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्याच्या मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या अनुषंगाने प्रशासनाकडून विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आज जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग मतदार विषयाचे नोडल अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी मनोज मेरत यांच्या अध्यक्षतेखाली दिव्यांग मतदार जाणीव जागृतीसाठी समाज कल्याण विभागांतर्गत संबंधित घटकांची बैठक घेण्यात आली. जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांत एकूण १६ हजार ६८१ दिव्यांग मतदार चिन्हांकित करण्यात आले आहेत. त्यामध्ये अंध, मुकबधीर व अन्य प्रवर्गातील दिव्यांगांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे ८५ वर्षावरील २९ हाजार ९९८ ज्येष्ठ मतदार आहेत. या सर्व मतदारांना त्यांच्या मतदानाचा अधिकार सहज व सुलभतेने बजाविता यावा, यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना केकरण्यात येत आहे. त्यासंदर्भात दिव्यांगामध्ये जाणीव-जागृती संदर्भाने ही बैठक घेण्यात आली. यावेळी मनोज मेरत यांनी दिव्यांग व ज्येष्ठांच्या मतदान प्रक्रियेच्या अनुषंगाने माहिती देऊन एकही मतदार सुटणार नाही, यासाठी दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना केंद्रस्थानी ठेऊन मतदार जाणीव जागृतीसाठी प्रयत्न आणि उपक्रमाची अंमलबजावणी करावी, असे आवाहन केले. तसेच मतदान केंद्रस्तरावरील सुविधा, अपरिहार्यता व वैयक्तिक विकल्प असल्यास मतपत्रिका आदी बाबतीत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचनांबद्दल स्थानिक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या माध्यमातून आवश्यक ते मार्गदर्शन आणि सहकार्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच जिल्ह्यातील शंभर टक्के दिव्यांग, ज्येष्ठ मतदार लोकशाहीच्या या उत्सवात उत्साहाने सहभागी होतील, यासाठी संघटीत प्रयत्न आणि उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे. तसेच भारत निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या ॲपचाही लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

# दुचाकीसाठी नवीन नोंदणी मालिका

जनसंचलन/बुलडाणा



उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे दुचाकी वाहनाकरीता नवीन नोंदणी मालिका सुरू करण्यात आली आहे. दि. २ एप्रिल २०२४ पासून दुचाकी वाहनाकरीता २८- ही नवीन मालिका नोंदणी क्रमांक ०००१ ते ९९९९ सुरु करण्यात येत आहे. याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कळविले आहे.

# निवडणूक निरीक्षकांकडून लोकसभा मतदारसंघाचा आढावा

जनसंचलन/बुलढाणा

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक सामान्य निरीक्षक पी. जे. भागदेव यांचे आगमन जिल्ह्यात झाले आहे. त्यांनी आज जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्यासमवेत बुलढाणा लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आढावा घेतला. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी लोकसभा मतदारसंघाच्या अनुषंगाने माहिती माहिती दिली. सध्यास्थितीमध्ये उमेदवारांचे नामांकन अर्ज स्विकारण्यात येत आहे. उमेदवारांकडून ऑनलाईन आणि ऑफलाईन अर्ज भरण्यात आले आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे. नामांकन अर्ज दाखल करण्यात आलेल्या एका उमेदवाराच्या एबी फार्मबद्दल मान्य नसल्याचे पत्र संबंधित उमेदवाराला देण्यात आले आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने फिरते पथक, स्थिर पथक यांची संख्या पुरेशी आहे. त्यांच्याकडून आलेल्या तक्रारींबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. आंतरराज्य आणि आंतर जिल्ह्याच्या ठिकाणी चेकपोस्ट सक्रीय आहे. जिल्ह्यात तीन क्रिटीकल मतदान केंद्र आहेत, परंतू या मतदान केंद्रावर मागील निवडणुकीत कोणताही अनुचित प्रकार घडला नव्हता. मतदाना-वर बहिष्कार, फेरमतदानामुळे ही केंद्रे क्रिटीकल मतदान केंद्रामध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. मतदान यंत्रे विधानसभा क्षेत्रनिहाय वाटप करण्यात आले आहे. मतदान यंत्रे सुरक्षित असून याबाबत खातरजमा करण्यात आली आहे. जिल्ह्यात एकाच ठिकाणी चार मतदान केंद्र असणाऱ्या सर्व मतदान केंद्राचे वेबकास्टींग करण्यात येणार आहे. मतदानासाठी दिव्यांग, महिला आणि युवा अशी आदर्श मतदान केंद्र करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी दिली.



# ३५ वर्षीय शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून केली आत्महत्या...

जनसंचलन/ सिंदखेडराजा

तालुक्यातील मोहाडी येथील विलास पंजाबराव रिंढे ह्या ३५ वर्षीय युवा शेतकऱ्याने कर्जबाजारीपणा व नापिकीला कंटाळून काल दि. २ एप्रिल, मंगळवारी दुपारी विष प्राशन केले होते. साखरखेर्डा येथे प्राथमिक उपचारानंतर त्याला बुलढाणा येथे हलविण्यात आले होते. उपचारा दरम्यान आज दि. ३ एप्रिल, बुधवारी सकाळी त्याची प्राणज्योत मालवली. सकाळी त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. मोहाडी येथील पंजाबराव दौलत रिंढे ह्यांच्याकडे १० एकर शेती आहे. पत्नी गंगुबाई, मुलगा विलास, संदीप, सूना नातवंडे असा एकत्रित परिवार होता. १० एकर शेतीत कुटुंबाचे भागत नाही म्हणून गावातील दुसऱ्या एका शेतकऱ्याची १० एकर शेती करण्यासाठी घेतली होती. रिंढे कुटुंबीयांतील मृतक विलास, आई गंगुबाई व भाऊ संदीप यांच्या नावावर प्रत्येकी एक लाख रुपये असे एकूण तीन लाख रुपये शेती कर्ज, तर आईच्या नावावर ट्रॅक्टरचे सहा लाख रुपये असे एकूण नऊ लाख रुपये कर्ज होते. ट्रॅक्टरच्या नादुरुस्तीचे रडगाणे सुरु असतांनाच दि. २९ मार्च, शुक्रवारी आलेल्या अवकाळी पावसामुळे त्यांच्या दोन एकर कांदा पिकाची नासाडी झाली. ह्या सगळ्या अडचणींच्या दबावाखाली विलासचा जीव मेटाकुटीला आला होता. त्यामुळे त्याची मनस्थिती व्यवस्थित नसल्याची मित्र मंडळीत चर्चा आहे. त्यातच काल दि. २ एप्रिल, मंगळव-ारी विलासने विष प्राशन केले. ही बाब समजताच शिवदास रिंढे ह्यांच्या जीपमधून त्याला साखरखेर्डा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांस तातडीने बुलढाणा येथे हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान रात्री उशीरा विलासची प्राणज्योत मालवली. आज दि. ३ एप्रिल, बुधवारी सकाळी मोहाडी येथे त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# बऱ्हाणपूर येथून चिखली येथे जाणारा ३० लाखाचा गुटखा जप्त...

जनसंचलन/नांदुरा

मध्यप्रदेशातील बऱ्हाणपुर येथुन मोठ्या चार चाकी वाहनातून चिखली येथे जाणारा सुमारे २९ लाख ७६ हजार रुपयाचा गुटखा अप्पर पोलीस अधीक्षक खामगाव कार्यालयाचे पथक व नांदुरा पोलिसांनी २ एप्रिल रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास जळगाव जामोद रेल्वे गेट जवळ पकडला. पोलिसांनी या प्रकरणी कपील राजु मिरेकर रा. देउळगाव राजा व दिपक नागप्पा काटकर रा.चिखली या दोघा चालक व वाहकाला अटक करून १६ लाखाचे चार चाकी वाहन, ९ हजारो २ मोबाईल आणि २९ लाख ७६ हजाराचा गुटखा असा ४५ लाख ८५ हजाराचा मुद्दे माल जप्त करून गुटखा माफीयाला हादरा दिला. याबाबत प्राप्त माहितीनुसार, मध्य प्रदेशातील बऱ्हाणपुर येथुन एका मोठ्या चारचाकी वाहनातून गुटखा येत असल्याची गुप्त माहिती अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांना मिळाली होती. या माहिती नंतर त्या कार्यालयाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सतिष आडे, नांदुरा ठाणेदार विलास पाटील, कैलास सुरडकर, मिलींद जवंजाळ, राहुल ससाने व अन्य कर्मचाऱ्यांनी दोन एप्रिल रोजी रात्री जळगाव जामोद रोडवर रेल्वे गेट जवळ नाकाबंदी केली असता एक टाटा कंपनीचे एम एच २८ बी बी ७२०६ हे वाहन संशयास्पद स्थितीत येत असल्याचे दिसून आल्याने पोलिसांनी या वाहनाची तपासणी केली असता त्यात राजनिवास पान मसाला-चे ३६ मोठे पोते कींमत १३ लाख ८२४०० रुपये ३लाख ३६ हजाराचा राजनिवास प्रिमियम जाफरानी जर्दा, १ लाख ७४ हजाराचा विमल गुटखा, २२ हजाराची विमल तंबाखू, ४ लाख ७० हजाराचा विमल पान मसाला, ३० हजाराची रुवी तंबाखू, १८ हजाराची वि बिग तंबाखू, २ लाख ८२ हजाराचा विमल पान मसाला, २ लाख ६१ हजाराचा विमल पान मसाला यासह अन्य काही कंपनीचा गुटखा असा एकूण २९ लाख ७६ हजाराचा प्रतिबंधीत गुटखा या वाहनात आढळून आल्याने पोलिसांनी सदर गुटखा, १६ लाख रुपये किंमतीचे टाटा कंपनीचे वाहन व ९ हजार रुपये किंमतीचे २ मोबाईल असा ४५ लाख ८५ हजाराचा मुद्दे माल जप्त केला. या प्रकरणी अप्पर पोलीस अधीक्षक खामगाव कार्यालयाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सतिष आडे यांच्या फिर्यादी वरुन नांदुरा पोलिस ठाण्यात आरोपी कपिल राजु मिरेकर वय २४ रा. देउळगाव राजा व दिपक नागप्पा काटकर वय ४५ रा. चिखली या दोघांविरुद्ध कलम १८८, २७३, ३२८, भादवी सहकलम अन्न सुरक्षा मानके अधिनियम २००६ कलम २६(२) () शिक्षापात्र कलम ५९ (१) अन्वये गुन्ह्याची नोंद करून आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास ठाणेदार विलास पाटील हे करीत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ठाण्यात शिवसेनेचाच उमेदवार, शिंदेंच्या नेत्याचा दावा, भाजप-शिवसेनेत चढाओढ सुरुच...

वृत्तसंस्था/मुंबई

ठाणे लोकसभा मतदार संघात उमेदवार शिवसेनेचा, की भाजपचा यावरून रस्सीखेच सुरू असताना, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी मात्र, ठाणे लोकसभा मतदारसंघ हा शिवसेनेलाच मिळेल, असा दावा केला आहे. त्यामुळे शिवसेना आणि भाजप यांच्यात ठाणे मतदार संघाच्या उमेदवारीवरून चढाओढ सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. ठाणे लोकसभा मतदार संघाच्या पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन शिबिर नुकतेच ऐरोलीमध्ये पार पडले. त्यावेळी केसरकर यांनी हा दावा केला आहे. यावेळी केसरकर यांनी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांसाठी केलेली विकासकामे, शिंदेंच्या कार्यपद्धतीची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवून मोदींचे हात बळकट करावे, असे आवाहन कार्यकर्त्यांना केले. तसेच ठाणे लोकसभा मतदार संघाविषयी बोलत असताना, केसरकर यांनी उमेदवारी निश्चितीबाबत शिंदे-फडणवीस यांच्यामध्ये चर्चा सुरू असून, या मतदारसंघावर शिवसेनेचा दावा करत आपलाच उमेदवार निवडून येईल, असा विश्वास व्यक्त केला.शिवसेना उपनेते विजय नाहाटा यांनी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आजवर केंद्र सरकारकडून सर्वाधिक निधी मिळवला आहे. राज्यात शिवसेनेची ताकद वाढली असून, लोकसभेत मुख्यमंत्री शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी महायुतीचा उमेदवार विजयी करण्याचे आवाहन केले.शिवसेना जिल्हाप्रमुख विजय चौगुले यांनी ठाणे लोकसभा हा मुळापासून शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या ठिकाणी ज्याला उमेदवारी देतील



त्याला आपण निवडून आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करावी, असे सांगत कार्यकर्त्यांनी हालगर्जी केल्यास त्यांना पदावरून पायउतार करण्यात येईल, असा सज्जड दमही दिला.

# महायुतीत बंडखोरी होणार नाही-भाजपाचा विश्वास

## बुथ प्रमुखाच्या नियोजनावरच उमेदवाराचा विजय-विनोद वाघ



जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा बुलढाणा लोकसभा मतदार संघात महायुतीचे अधिकृत उमेद्वार खा. प्रतापराव जाधव असून महायुतीत कोणीही बंडखोरी करणार नाही, यासाठी वरिष्ठ नेते निर्णय घेणार असल्याचे भाजप प्रवक्ते विनोद वाघ यांनी सांगितले. बुलढाणा येथील पत्रकार भवनात ३ एप्रिल रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत भाजप जिल्हा उपाध्यक्षा विजया राठी, माजी शहराध्यक्ष सिद्धार्थ शर्मा, भाजपा युवा आघाडी जिल्हाप्रमुख विनायक भाग्यवंत, सोहम झाल्टे, आशिष व्यवहारे प्रामुख्याने उपस्थित होतेभाजप प्रवक्ते विनोद वाघ यांनी सांगितले की, लोकसभा निवडणूक पत्रकार परिषदेत बोलतांना विनोद वाघ बाजूला नियोजन करतांना महायुतीच्या उमेदवाराचे तसेच घटक पक्षाचे ज्या मतदार संघात उमेदवार आहेत. शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट यांचा विजय संपादन करण्यासाठी प्रत्येक बूथवर भारतीय जनता पक्ष बुथ प्रमुख व सहयोगी कार्यकर्त्यांमार्फत तसेच लढाई लढणार आहे. वेगवेगळ्या समाजाच्या समूहात मतदार जागृतीसाठी सुक्ष्म पद्धतीने भाजप कार्यकर्ते काम करीत आहे. भाजपचे लोकसभा निवडणूक प्रमुख विजयराज शिंदे यांनी अर्ज दाखल केला आहे. या प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी सांगितले की, महायुतीत बंडखोरी होणार नाही हा भाजपचा विश्वास आहे. ते लवकरचं अर्ज मागे घेतील असे ते या वेळी पत्रकार परिषद मध्ये बोलत होते.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958